**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १६ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

**1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर, नागपूर इथं कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ग्रंथालयासाठी पाच कोटींचा निधी देण्याचं राज्य सरकारचं आश्वासन.**

**2. जलजीवन अभियानाअंतर्गत राज्यात आतापर्यंत २६ हजार ४९९ कामं पूर्ण झाल्याची मंत्री गुलाबराव पाटील यांची माहिती.**

**3. कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आधुनिक उपाययोजनांचा प्रभावी वापर करण्यासाठी राज्य शासनाचा करार.**

**4. ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या 'काळ्या निळ्या रेषा' या आत्मचरित्राला २०२५ चा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर.**

---

**विधानसभा**

नागपूर इथल्या डॉ बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर इथं कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित ग्रंथालयासाठी पाच कोटींचा निधी दिला जाईल आणि पुढल्या तीन महिन्यांत हे ग्रंथालय सुरू होईल असं आश्वासन सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी विधानसभेत दिलं . नितीन राऊत यांनी लक्षवेधी द्वारे हा मुद्दा उपस्थित केला होता. या ग्रंथालयात जागतिक दर्जाची अभ्यास साधनं उपलब्ध करून दिली जातील असं शिरसाट यांनी सांगितलं. या कन्व्हेन्शन सेंटरमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा ४० फुट पुतळा उभारण्याचं काम सुरू असून दोन महिन्यांत ते काम पूर्ण होईल असंही शिरसाट यांनी सांगितलं. या सेंटरसाठी अर्थसंकल्पात ३० कोटींची तरतूद केली आहे. व्यवस्थापनासाठी ४ कोटी ९० लाख आणि वीजबिलासाठी २ कोटी ३ लाख ७६ हजार रुपये निधी दिल्याची माहिती त्यांनी दिली.

ऐकुया आजच्या विधिमंडळ कामकाजाचा हा वृत्तांत

***(व्हॉईस कास्ट -धैर्यशील मेश्राम)***

*मुंबईप्रमाणेच राज्यातल्या सर्व खासगी रुग्णालयं आणि शुश्रुषागृहांचा आढावा घेण्यासाठी, आणि नोंदणी नसलेल्या अशा आस्थापनांवर कारवाई करण्यासाठी एक समिती स्थापना करण्याची घोषणा नगरविकास खात्याचे प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत केली. नगरविकास खात्याचे अतिरिक्त मुख्य सचिव या समितीचे अध्यक्ष असतील.सन २०३७ पर्यंत एसटी महामंडळाच्या ताफ्यातल्या सर्व बस इलेक्ट्रिक करायची योजना आखल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानपरिषदेत दिली. सध्या महामंडळाकडे २२ हजार साध्या बस, तर ८०० च्या आसपास इलेक्ट्रिक बस आहेत. २०३७ पर्यंत टप्प्याटप्प्याने या साध्या बसेसचं रूपांतर इलेक्ट्रीक बसमध्ये करायचा मानस असल्याचं त्यांनी सांगितलं.महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना मोफत उपचार देणं रुग्णालयांना बंधनकारक असून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जात आहे असं आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाशआबिटकर यांनी सांगितलं. अशा ३३७ प्रकरणात ६० लाख ४७ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे, तसंच १२ रुग्णालयांवर कारवाई केली आहे असं त्यांनी सांगितलं.पांढरं रेशनकार्ड धारकांना या योजनेंतर्गत मोफत उपचार उपलब्ध असून अतिरिक्त पैसे घेणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई केली जाईल असं आबिटकर यांनी स्पष्ट केलं. सुनील प्रभू, नाना पटोले यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. होमिओपॅथी डॉक्टरांना काही ॲलोपॅथी औषधं लिहून देण्याच्या परवानगी देण्यासंदर्भात सरकार सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची वाट पाहत असल्याचं वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज विधानसभेत सांगितलं. एका लक्षवेधी सूचनेला त्या उत्तर देत होत्या.*

*आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी धैर्यशील मेश्राम*

---

**विधानसभा / जल जीवन मिशन**

केंद्र सरकारने डिसेंबर २०२६ पर्यंत जलजीवन अभियानाला मुदतवाढ दिली असून महाराष्ट्रात आतापर्यंत या अंतर्गत २६ हजार ४९९ कामं पूर्ण झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. नाना पटोले, अमिन पटेल, अस्लम शेख, नारायण कुचे यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. राज्यात जलजीवन अभियानांतर्गत कामं अर्धवट राहिल्याचं या सदस्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिलं. यावर जलजीवन अभियानांतर्गत राज्यभरात ५१ हजार ५६० योजना सुरू असून यापैकी २५ हजार ६१ योजना प्रगतीपथावर आहेत असं गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. या योजनेची तरतूद वाढवून ती ८ लाख ७९ हजार कोटींपर्यंत वाढवली आहे, महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून १६ हजार कोटी येणं अपेक्षित आहे. राज्य

सरकारने ४ हजार ८०० कोटी दिले आहेत असं पाटील यांनी सांगितलं. राज्यात या अभियानांतर्गत योजनांसाठी ३१ हजार ३६९ कोटी निधीची गरज असल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं.

---

**विधानसभा / एलपीजी**

एलपीजी आणि सीएनजीच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्ह्यात नेमलेल्या समित्यांनी आत्तापर्यंत १ हजार २०८ सिलेंडर जप्त केले असून २३ गुन्हे दाखल करून १८ जणांना अटक केल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी आज विधानपरिषदेत दिली. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत ३३ लाख ६६ हजार रुपयांपेक्षा जास्त असल्याचं त्यांनी सांगितलं. एलपीजीला पर्याय म्हणून रॉकेल उपलब्ध करायचा विचार सरकार करत असून याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाला पत्राद्वारे कळवलं आहे, अशी माहितीही भुजबळ यांनी दिली.

---

**धडक कारवाई**

गॅस सिलिंडरचा अवैधरीत्या व्यावसायिक वापर रोखण्यासाठी वाशीम जिल्ह्यातील कारंजा शहरात तहसील प्रशासनाच्या पथकाने धडक कारवाई करत विविध हॉटेल्स, चहा-नास्ता केंद्रांची तपासणी केली. या मोहिमेत एकूण २६ ठिकाणांची तपासणी करण्यात आली. अचानक टाकलेल्या छाप्यांमध्ये तीन ठिकाणी घरगुती गॅस सिलिंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याच उघड झाल असून संबंधितांकडून सिलिंडर जप्त करण्यात आले.

---

**आरोग्य करार**

कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय आधारित आधुनिक उपाययोजनांचा प्रभावी वापर करण्यासाठी राज्य शासन आणि वाधवानी एआय, या ना-नफा-ना-तोटा तत्वावर कार्यरत संस्थेमध्ये सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत आज मुंबईत हे करार करण्यात आले. या कराराअंतर्गत क्षयरोग, मातृ - नवजात तसंच बाल आरोग्य, प्राथमिक आरोग्य सेवा, ई-हेल्थ आदी क्षेत्रांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा समावेश करून आरोग्य सेवांचा दर्जा अधिक उंचावण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्यासाठी एआयचा वापर हा 'फोर्स मल्टिप्लायर' ठरणार असून, वाधवानी एआयच्या सहकार्याने एआय सक्षम आरोग्य व्यवस्था उभारणार असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं.

---

**राज्यसभा मतदान**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आज मतदान होत आहे. १० राज्यांमधल्या ३७ रिक्त जागांपैकी २६ जागांवर बिनविरोध निवड झाली आहे. त्यात महाराष्ट्रातल्या ७ जागांचा समावेश आहे. बिहारमधे ५ जागांसाठी, ओदिशात ४ ,आणि हरियाणात दोन जागांसाठी आज मतदान होत आहे.

---------------------------------------------------

**साहित्य अकादमी पुरस्कार**

ज्येष्ठ चित्रकार राजू बाविस्कर यांच्या काळ्या निळ्या रेषा या आत्मचरित्राला २०२५ चा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. आज साहित्य अकादमीने २४ भारतीय भाषांतील साहित्यासाठी पुरस्कार जाहीर केले. यामध्ये आठ कवितासंग्रह, चार कादंबऱ्या, सहा लघुकथा संग्रह दोन निबंधसंग्रह, एक समीक्षण, एक आत्मकथा आणि दोन संस्मरण यांचा समावेश आहे. रुपये एक लाख आणि सन्मान पत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. प्रसिद्ध चित्रकार राजू बाविस्कर हे सेवानिवृत्त कलाशिक्षक असून जळगाव जिल्ह्यातील पीएम मुंदडे माध्यमिक विद्यालय पिंपराळा इथं 33 वर्ष त्यांनी सेवा दिली आहे. काळ्या निळ्या रेषा या पुस्तकाची सुरुवात विदर्भ साहित्य संघाच्या युगवाणी या नियतकालिकातूनच झालेली आहे असं राजू बाविस्कर यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं. -

***(होल्ड बाईट - राजू बाविस्कर - ३१ सेकंद )***

---------------------------------------------------

**हर्षवर्धन सपकाळ**

अमेरिका इस्त्राईल - इराण यांच्यात सुरु असलेल्या युद्धाचा जगभर परिणाम होत आहे. या युद्धजन्य परिस्थितीमुळे भारतातही गॅस आणि इंधन तुटवडा जाणवू लागला आहे. हे युद्ध लवकर संपून आशियात शांतता निर्माण व्हावी, अशी सदिच्छा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी आज इराणच्या कॅान्सुलेटला भेट देऊन मुंबईतील इराणचे कॅान्सुल जनरल सईद रझा मोसायब मोतलाघ यांच्याशी चर्चा केली. या भेटीदरम्यान इराणचे सर्वोच्च नेते दिवंगत अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधना बद्दल तसेच हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या सैनिक आणि नागरिक, विशेषता १६५ शाळकरी मुली आणि १४ शिक्षकांबद्दल आणि दोन्ही बाजूच्या मृत्युमुखी पडलेल्यांप्रती शोक संवेदना व्यक्त केल्या. युद्ध लवकरात लवकर संपावे आणि शांतता प्रस्थापित व्हावी अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

---------------------------------------------------

**स्टँड-अप इंडिया**

देशभरातील अनुसूचित जाती-जमाती आणि महिला उद्योजकांना अधिक लाभ मिळवून देण्यासाठी, सरकार 'स्टँड-अप इंडिया' योजनेचं नुतनीकरण करुन नवीन आवृत्ती आणणार असल्याची माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज लोकसभेत दिली. एप्रिल २०१६ मध्ये सुरू करण्यात आलेली 'स्टँड-अप इंडिया' योजना, गेल्या वर्षी मार्चमध्ये संपुष्टात आली होती. नीती आयोग आणि इतर विभागांनी या योजनेचा अभ्यास केला असून, लाभार्थ्यांना अधिक फायदे देण्यासाठी या योजनेची पुनर्रचना केली जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

---------------------------------------------------

**महावितरण**

राज्यातील सर्व वीजग्राहकांना परवडणाऱ्या दरात वीज उपलब्ध करून देणे आणि तांत्रिक अचूकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंदर्भात अकोला परिमंडळाच्या महावितरणने स्मार्ट ग्रीड अंतर्गत विकसित केलेली 'सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम' देशात सर्वोत्तम ठरली आहे. इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी आणि इनोव्हेशन परिषदेमध्ये महावितरणचा 'आयएसजीफ इनोव्हेशन अवॉर्ड २०२६' या राष्ट्रीय पुरस्काराने गौरव करण्यात आल्याची माहिती महावितरण अकोला परिमंडळाद्वारे देण्यात आली आहे.

---------------------------------------------------

**हवामान**

नागपुरात आज सदतीस पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. दरम्यान मागील 24 तासांत अमरावती इथं सर्वाधिक चाळीस पूर्णांक सहा दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवलं गेलं. दरम्यान आज पूर्व विदर्भातील काही जिल्हयांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळाचा इशारा जारी करण्यात आला असून ही परिस्थिती वीस मार्चपर्यंत कायम राहण्याचा अंदाज आहे.

---------------------------------------------------